# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र-१३४** **दिनांक - ०४/०४/२०२४**

**मयत ब्रिजेश चौरसिया याचे मृत्युचे रहस्य उलगडण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

क्ष्क्ष:

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १७/०१/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वा.च्या सुमारास अशोक गुंजाळकर यांच्या धानिव पांढरीपाडा नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथील खोल दगडाच्या खदानीमध्ये एक इसम पडुन मयत झाला असल्याबाबत श्री. आरबाज राजु राईन, वय २१ वर्षे, रा. धानिवबाग नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांनी दिलेल्या खबरीवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यु रजि. क्र ०३/२०२४ नोंद करण्यात आला होता. सदर प्रकरणाची चौकशी पोहवा/भाईदास शिंगाणे पेल्हार पो. स्टे. हे करीत होते. सदर प्रकरणाचे चौकशीत खदाणीत मिळुन आलेले प्रेत हे ब्रिजेश कामताप्रसाद चौरासिया, वय ४१ वर्षे, रा. जाबर पाडा, पेल्हार नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मयत याची बहिण श्रीमती. सारिका चौरसिया यांनी मयत याची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला होती.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन व.पो.निरी. श्री. जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. श्री. सोपान पाटील यांना योग्य त्या सुचना देऊन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत आदेशित केले.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सदर प्रकरणाची चौकशी करुन मयत यांची बहिण व साक्षीदार यांच्याकडे चौकशी करुन मयत व त्याचा मित्र बलराम यादव हे दोघे दि. १७/०१/२०२४ रोजी सदरचा गुन्हा घडेपर्यत एकत्र सोबत असल्याचे व मयत ब्रिजेश हा खदानीमध्ये पडला तेव्हा खदानीच्या जवळ असलेल्या लोकांनी एका इसमाने मयत ब्रिजेश यास धक्का देऊन खदानीमध्ये ढकलुन पळुन जात असल्याबाबत सांगितले. म्हणुन इसम बलराम लालचंद यादव ऊर्फ बलीराम, वय २७ वर्ष, यास विश्वासात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने मयत ब्रिजेश चौरसिया याचेकडून यापूर्वी एकुण ५५,०००/- रुपये घेतले होते. त्यापैकी २२,०००/- रुपये परत देऊन देखील ब्रिजेश याने बलराम यादव यास दिनांक १६/०१/२०२४ रोजी सायंकाळी जाबरपाडा येथील राहत्या दुकानगाळयात बोलावुन त्याच्याकडुन १००/- रु.च्या स्टॅम्प पेपरवर ३,००,०००/- रुपये घेतल्याचे लिहुन घेऊन त्यास रात्रभर डांबुन ठेऊन शिवीगाळी व दमदाटी करुन पैसे मागितलेले होते. त्यामुळे बलराम यादव याने मयतास दिनांक १७/०१/२०२४ रोजी मयत हा पैश्याकरीता तगादा लावत असल्याचा व रात्रभर डांबुन ठेवल्याचा राग मनात धरुन दुपारी १४.०० वा. च्या सुमारास धानिव पांढरीपाडा याठिकाणी मयताचा जिव घेण्याच्या उद्देशाने त्यास धक्का देऊन रस्त्यालगतच्या खोल दगडाच्या खदानीमध्ये ढकलुन देऊन त्यास जिवे ठार मारले असल्याचे निष्पन्न झाल्याने बलराम लालचंद यादव ऊर्फ बलीराम, वय २७ वर्ष रा. नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर याचे विरुध्द तक्रार दिल्याने पेल्हार पोलीस ठाणे गु. र. क्र. ३७४/२०२४ भादविस कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन मोहिते, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखील मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

